भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१२-१३/३५**
**डीएनबीएस(पीडी) सीसी क्र.२८४/०३.०२.००१/२०१२-१३** **जुलै २, २०१२**

प्रति,
अध्यक्ष/सीईओ सर्व संकीर्ण अबँकीय कंपन्या

महोदय,

**जून ३०, २०१२ पर्यंत सुधारित केलेली अधिसूचना "संकीर्ण अ-बँकीय कंपन्या ( रिझर्व बँक ) निदेश, १९७७"**

आपणास माहितच आहे की, ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी रिझर्व बँकेने जून ३०, २०१२ रोजी अद्यावत केलेल्या अधिसूचना क्र.डीएनबीसी.३९/डीजी (एच)-७७, दि. २० जून १९७७ मधील सूचना खाली दिल्या आहेत. ही अद्यावत केलेली अधिसूचना आरबीआयच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आली आहे.

आपली नम्र,

(उमा सुब्रमणियम्)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

अनुक्रमाणिका


| परिच्छेद क्र. | तपशील |
|---|---|
| | **भाग १ - प्रास्ताविक** |
| १. | लघु शीर्षक व निदेशांची सुरुवात |
| २. | निदेशांची व्याप्ति |
| ३. | व्याख्या |
| ४. | काही प्रकारच्या धन-ठेवींना हे निदेश लागु न होणे |
| | **भाग - २ ठेवींचा स्वीकार** |
| ५. | संकीर्ण अ-बँकीय कंपन्यांद्वारे ठेवींचा स्वीकार |
| ६. | ठेवीबाबत विनंतीच्या अर्जावर द्यावयाचा तपशील |
| ७. | ठेवीदारांना पावत्या देणे |
| ८. | ठेवींचे रजिस्टर |
| ९ | संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट करावयाची माहिती |
| | **भाग ३ - संकीर्ण** |
| १० | रिझर्व बँकेला द्यावयाच्या ताळेबंद व लेखा आणि संचालकांचा अहवाल ह्यांच्या प्रती. |
| ११ | रिझर्व बँकेला सादर करावयाचे अहवाल (रिटर्न्स) |
| १२ | [पर्यवेक्षण विभागाला] सादर करावयाचे ताळेबंद, अहवाल इत्यादि |
| १३. | जाहिराती आणि जाहिरातीच्या ऐवजी निवेदन |
| १४. | सूट (एक्झेंप्शन) |
| १५. | काही इतर अटींचे लागु न होणे |
| १६. | संकीर्ण अबँकीय कंपन्या ( रिझर्व बँक) निदेश १९७३ चे उल्लंघन केल्यामुळे केलेली किंवा करावयाची कारवाई वाचविणे. |
| | जोडपत्र |

**भारतीय रिझर्व बँक**

**अ-बँकिय पर्यवेक्षण विभाग**

**केंद्रीय कार्यालय**

**केंद्र - १, वर्ल्डट्रेड सेंटर**

**कफ परेड, कुलाबा**

**मुंबई - ४०० ००५**

**अधिसूचना क्र. डीएनबीसी३९/डीजी(एच) - ७७ दि. २० जून १९७७**

रिझर्व बँकेने, जनहिताच्या दृष्टीने योग्य असल्याचे वाटल्याने आणि कर्ज प्रणालीचे देशहितासाठी विनियमन करण्यास ह्या बँकेला सहाय्य होईल ह्याबाबत ह्या बँकेचे समाधान झाल्याकारणाने, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५जे, ४५के व ४५एल कलमांच्या अनुसार दिलेल्या अधिकारांचा तसेच ह्याबाबत साह्यभूत असलेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन, आणि वेळोवेळी सुधारित केलेल्या अधिसूचना क्र. डीएनबीसी.२१/डीजी(एस)-७३ दि.२३ ऑगस्ट १९७३ मध्ये दिलेल्या निदेशांना रद्दबातल करुन, भारतीय रिझर्व बँक, प्रत्येक संकीर्ण अबँकीय कंपनीला पुढे विहित केलेले निदेश देत आहे.

## भाग १ - प्रास्ताविक

### १. लघु शीर्षक व निदेशांची सुरुवात

ह्या निदेशांना संकीर्ण अबँकीय कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, १९७७ असे म्हटले जाईल. हे निदेश १ जुलै १९७७ पासून जारी होतील. आणि ह्या निदेशांमधील सुरुवात होण्याच्या तारखेचा संदर्भ वरील तारखेशी समजला जाईल.

### २. ह्या निदेशांची व्याप्ति

[१][हे निदेश, एक कंपनी असलेल्या आणि जम्मू व काश्मिर राज्यामधील कोणत्याही जागी पुढीलपैकी कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक वित्त संस्थेला तसेच एक कंपनी असलेल्या आणि भारतामधील कोणत्याही जागी खालील उप-परिच्छेद (२) ते (४) मध्ये संदर्भित केलेल्या व्यवसायांपैकी कोणताही व्यवसाय करणाऱ्या वित्तसंस्थेला लागु होतील :-

१) एखादा प्रायोजक, म्होरक्या, एजंट किंवा अन्य कोणत्याही क्षमतेत, देणग्या, किंवा वर्गण्या, किंवा युनिट् प्रमाणपत्रे, किंवा इतर संलेखांच्या द्वारे विक्री करुन किंवा अन्य कोणत्याही रितीने किंवा सभासद शुल्क किंवा प्रवेश शुल्क किंवा कोणत्याही बचतीसाठी, म्युच्युअल फंड, काटकसर किंवा कोणत्याही नावाने असलेली योजना किंवा व्यवस्था ह्यांच्याद्वारे पैसा गोळा करणे आणि असा गोळा केलेला पैसा किंवा त्याचा भाग किंवा गुंतवणुकी मधून जमा झालेला पैसा किंवा पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही हेतूसाठी वापरणे -

[१] अधिसूचना क्र. डीएनबीसी ४१/ईडी (टी) -७७ दि. मे ९, १९७९ द्वारा प्रतिस्थापित

अ) चिठ्ठया टाकून (लॉट), सोडत किंवा अन्य प्रकारे ठरविण्यात आलेल्या वर्गणीदारांच्या (सबस्क्रायबर्स) विशिष्ट संख्येला, नियतकालिक किंवा अन्य तऱ्हेने, बक्षिसे किंवा रोख देणग्या किंवा तत्सम वस्तु देणे किंवा बहाल करणे - मग ते बक्षिस किंवा देणगी स्वीकारणाऱ्या व्यक्तीवर, अशा योजना किंवा व्यवस्थांखाली पुढील प्रदान करण्याची जबाबदारी असो किंवा नसो.

ब) अशी योजना किंवा व्यवस्था समाप्त झाल्यावर, किंवा त्या योजनेत दिलेला कालावधी संपल्यानंतर, वर्गणीदारांना किंवा ज्यांनी बक्षिसे किंवा देणगी जिंकली नाही अशा व्यक्तींना, त्यांनी दिलेले सबस्क्रिप्शन किंवा गोळा केलेला पैसा संपूर्णतः किंवा अंशतः परत करणे.

२) असा कोणत्याही व्यवहार किंवा व्यवस्था, की ज्यामुळे, ती कंपनी विशिष्ट संख्येच्या वर्गणीदारांबरोबर असा करार करते की, एका निश्चित कालावधीमध्ये, हप्त्यांमध्ये, त्या वर्गणीदारांमधील प्रत्येकजण एक विशिष्ट रक्कम वर्गणी म्हणून देईल आणि अशा वर्गणीदारांपैकी प्रत्येकाला, चिठ्ठया टाकून किंवा सोडत किंवा बोली बोलून किंवा त्या करारनाम्यात तरतुद केलेल्या प्रकारे बक्षिसाची रक्कम मिळविण्याचा हक्क असेल, अशा प्रकारचा कोणताही व्यवहार किंवा व्यवस्था, एक प्रायोजक, म्होरक्या किंवा एजंट या नात्याने करणे, पर्यवेक्षण करणे अथवा व्यवस्थापित करणे.

**<u>स्पष्टीकरण</u>**

ह्या उप-परिच्छेदासाठी, "बक्षिसाची रक्कम" ह्या संज्ञेचा अर्थ म्हणजे, सर्व वर्गणीदारांनी प्रत्येक हप्त्यामध्ये दिलेल्या वर्गणीच्या एकूण रकमेमधून वजा करुन कोणत्याही नावाने ठरविलेली रक्कम.

अ) कंपनी आकारलेले कमिशन किंवा प्रायोजक किंवा म्होरक्या किंवा एजंट ह्यांनी लावलेले सेवा-आकार, आणि-

ब) प्रत्येक हप्त्याच्या वर्गणीच्या एकूण रकमेतून वर्गणीदार, त्याला मिळणाऱ्या उर्वरित रकमेचा विचार करुन सोडून देण्यास तयार आहे अशी कोणतीही रक्कम.

३) वरील उप-परिच्छेद (२) मध्ये संदर्भित प्रकारच्या व्यवहारांपेक्षा वेगळ्या प्रकारच्या चिट किंवा कुरी चालवणे.

४) वरील उप-परिच्छेद (१) ते (३) मध्ये संदर्भित व्यवहारांपेक्षा वेगळा व्यवहार अंगिकारणे किंवा चालवीत असणे.

**(३) <u>व्याख्या</u>**

१) ह्या निदेशांमध्ये वेगळा संदर्भ नसल्यास-

अ) "बँकिंग कंपनी" म्हणजे, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०) च्या कलम ५(क) मध्ये व्याख्या केलेली बँकिंग कंपनी.

ब) "कंपनी" म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५ आय (अ) मध्ये व्याख्या केलेली कंपनी. परंतु ह्यात अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली बंद करण्यात आलेली कंपनी समाविष्ट नाही.

क) "ठेव" ह्या संज्ञेचा अर्थ, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५ आय (बब)मध्ये दिलेल्यानुसार असेल.

ड) "ठेवीदार" म्हणजे, त्या कंपनीत ज्याने ठेव ठेवली आहे अशी कोणतीहि व्यक्ती.

ई) "म्होरक्या (फोरमन)" म्हणजे, त्या चिट किंवा कुरीच्या करारनाम्याखाली, किंवा कोणत्याही योजने किंवा व्यवस्थेखाली, ती चिट किंवा कुरी किंवा अशी योजना किंवा व्यवस्था चालविण्यास जबाबदर असलेली व्यक्ती.

फ) "मुक्त राखीव निधी (फ्री रिझर्व्ज)" ह्यात पुढील गोष्टींचा समावेश असेल शेअर प्रिमियम खात्यातील शिल्लक, भांडवल व डिबेंचर रिडेम्शन रिझर्व, आणि एखाद्या कंपनीच्या ताळेबंदात दाखविलेला किंवा प्रसिध्द

केलेला आणि नफ्यांच्या वाटपामधून (ॲलोकेशन) निर्माण केलेला कोणताही राखीव निधी (रिझर्व). तथापि तो निधी (१) भविष्यातील दायित्वांच्या पुनर्प्रदानासाठी निर्माण केलेला राखीव निधी किंवा वाईट कर्जासाठी किंवा ॲसेट्सच्या मूल्यऱ्हासाठी असू नये. किंवा (२) त्या कंपनीच्या ॲसेट्सचे पुनर्मूल्यांकन करुन केलेला राखीव निधी असू नये.

ग) "संकीर्ण अ-बँकीय कंपनी" म्हणजे, ह्या निदेशांच्या परिच्छेद २ मध्ये संदर्भित प्रकारांच्या व्यवहारांपैकी सर्व किंवा कोणताही व्यवहार करत असलेली कंपनी.

ह) ह्यामध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले परंतु भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ (१९३४ चा २) मध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दसमूह ह्यांचा अर्थ त्या अधिनियमात दिल्यानुसारच असेल. ह्यात किंवा भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ (१९३४ चा २) ह्यामध्ये व्याख्या न केल्या गेलेल्या शब्दांचा शब्दसमूहांचा अर्थ, कंपनी अधिनियम, १०५६ (१९५६ चा १) ह्यात दिल्यानुसार असेल.

## (४) काही प्रकारच्या धन-ठेवींना हे निदेश लागु न होणे

एखाद्या संकीर्ण अ-बँकीय कंपनीने स्वीकारलेल्या पुढील प्रकारच्या ठेवींसाठी, ह्या निदेशांच्या परिच्छेद ५ ते (९ ब)[(२)] व १३ मधील कोणतीही बाब लागु होणार नाही-

१) परिच्छेद २ च्या उपपरिच्छेद (२) मध्ये संदर्भित व्यवहार किंवा व्यवस्थेखाली मिळालेला किंवा गोळा केलेला पैसा.

२) केंद्र सरकार किंवा राज्य सरकार कडून मिळालेला पैसा, किंवा कोणत्याही अन्य स्त्रोतामधून मिळालेला व केंद्र सरकार किंवा राज्य सरकारने ज्याच्या पुनर्प्रदानाबाबत हमी दिली आहे असा पैसा, किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणापासून किंवा विदेशी सरकार किंवा अन्य विदेशी नागरिक, प्राधिकरण किंवा व्यक्ती ह्यांच्याकडून मिळालेला पैसा.

३) एखाद्या बँकिंग कंपनीकडून किंवा भारतीय स्टेटबँकेकडून मिळालेला पैसा किंवा बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०) च्या कलम ५१ खाली केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या बँकिंग संस्थेकडून मिळालेला पैसा, किंवा बँकिंग कंपनीज (ॲक्विझिशन अँड ट्रान्स्फर ऑफ अंडरटेकिंग) अधिनियम, १९७० (१९७० चा ५) च्या कलम २ मध्ये व्याख्या केलेल्या सहप्रतिवादी नव्या बँकेकडून मिळालेला, किंवा बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०) च्या [३][कलम ५ (सीसीआय)] मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सहकारी बँकेकडून मिळालेला पैसा.

४) इंडस्ट्रियल डेवलपमेंट बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९६४(१९६४ चा १८) खाली स्थापन झालेल्या इंडस्ट्रियल डेवलपमेंट बँक ऑफ इंडिया, किंवा इंडियन कंपनीज अधिनियम, १९१३ (१९१३ चा ७) खाली स्थापन झालेल्या इंडस्ट्रियल क्रेडिट अँड इनवेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

[२] अधिसूचना क्र. ४४/ईडी(बी) -८१ दि, एप्रिल १५, १९८१ नुसार प्रतिस्थापित

[३] अधिसूचना क्र डीएफसी (सीओसी) ७४ ईडी(एस) दि. एप्रिल १९, १९९४ नुसार प्रतिस्थापित

किंवा इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन अधिनियम १९४८ (१९४८ चा १५) खाली स्थापित इंडस्ट्रियल रिकन्स्ट्रक्शन बँक ऑफ इंडिया लि., किंवा लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, किंवा [४][स्मॉल इन्ड्स्ट्रीज डेवलपमेंट बँक ऑफ इंडिया अधिनियम १९८९ (१९८९ चा ३९) ] खाली स्थापित स्मॉल इडस्ट्रीज डेवलपमेंट बँक ऑफ इंडिया, किंवा स्टेट फायनान्शियल कॉर्पोरेशन अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६३) खाली स्थापित, स्टेट फायनान्शियल कॉर्पोरेशन किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, किंवा जनरल इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि तिच्या दुय्यम संस्था, किंवा तामिलनाडु इंडस्ट्रियल इनवेस्टमेंट कॉर्पोरेशन लि, किंवा नॅशनल इंडस्ट्रियल डेवलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया किंवा [५](एससीआयसीआय) किंवा रिहॅबिलिटेशन इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि, किंवा इलेक्ट्रिसिटी (सप्लाय) अधिनियम, १९४८ खाली स्थापित कोणतेही वीज मंडळ, किंवा स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि, किंवा ॲग्रिकल्चरल फायनान्स कॉर्पोरेशन लि. किंवा गुजरात इंडस्ट्रियल अँड इनवेस्टमेंट कॉर्पोरेशन लि. किंवा [६][एशियन डेवलपमेंट बँक किंवा इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन, किंवा] केंद्र सरकार अथवा राज्य सरकार ह्यांच्या संपूर्ण मालकीची अन्य वित्त संस्था, किंवा ह्याबाबत रिझर्व बँकेने अधिसूचित केलेल कोणतीही अन्य वित्तसंस्था ह्यांच्या कडून मिळालेले कर्ज.

(५) काढून टाकण्यात आले [७]

(६) काढून टाकण्यात आले [७]

[८][(७) कंपनीच्या एखाद्या कर्मचाऱ्याकडून त्याच्या कर्तव्याबाबत सुरक्षा ठेव म्हणून मिळालेला पैसाः-

मात्र अशा सुरक्षा ठेवीच रक्कम, तो कर्मचारी व ती कंपनी ह्यांच्या संयुक्त नावांनी, पुढील अटींवर, एखाद्या अनुसूचित बँकेत किंवा पोस्ट ऑफिसात ठेवलेली असावी,-

अ) ती रक्कम, त्या कर्मचाऱ्याने लेखी संमती दिल्याशिवाय काढली जाणार नाही; आणि-

ब) ती रक्कम, त्या कर्मचाऱ्याच्या नोकरीच्या अटींनुसार, व त्या ठेवीवर बँकेने, पोस्ट ऑफिसाने दिलेल्या व्याजासह परतफडे केली जाईल. ]

[९][(८) संबंधित डिबेंचर्स किंवा बॉड्सचे, इक्विटी भाग भांडवलात रुपांतर करण्यासाठी, प्रचालक किंवा धारक ह्यांना कोणताही पर्याय न देता, रुपांतरणाच्या पूर्व-निश्चित अटींसह डिबेंचर्स किंवा बॉड्स देऊन उभी केलेली रक्कम]

(९) संबंधित शेअर्स किंवा स्टॉकचे वाटप प्रलंबित असताना कोणत्याही शेअर किंवा स्टॉकची वर्गणी म्हणून मिळालेला पैसा किंवा संबंधित डिबेंचर्स किंवा बॉड्स वाटप प्रलंबित असताना, ह्या परिच्छेदातील कलम (८) मध्ये निर्देश डिबेंचर्स किंवा बॉड्स ह्यांची वर्गणी म्हणून मिळालेला पैसा आणि त्या कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोशिएशनखाली असा पैसा शेअरधारकांना पुनर्प्रदान करणे आवश्यक नसल्यास, त्या कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोशिएशननुसार, त्या शेअर्सवर कॉल्सच्या स्वरुपात अग्रिम राशी म्हणून मिळालेला पैसा.

[४] अधिसूचना क्र. डीएफसी (सीओसी) ६५ डीजी(टी)/९१.९२ दि. जून १७, १९९२ द्वारा प्रविष्ट

[५] अधिसूचना क्र. डीएफसी (सीओसी)७१ईडी(एस)/९३ दि. मे १२, १९९३ द्वारा प्रस्थापित

[६] अधिसूचना क्र. डीएफसी (सीओसी)८७ईडी(जेआरपी)/९३ दि. जुलै २४,१९९६ द्वारा प्रविष्ट

[७] अधिसूचना क्र. डीएफसी (सीओसी)६७ईडी(एस)/९३ दि. एप्रिल १०,१९९३ द्वारा वगळण्यात आले.

[८] अधिसूचना क्र. डीएफसी (सीओसी)६२डीजी(जे) ९१ दि. सप्टेंबर १९,१९९१ द्वारा प्रतिस्थापित

[९] अधिसूचना क्र. डीएफसी (सीओसी) ८७ ईडी(जेआरपी) ९६ दि. जुलै २४,१९९६ द्वारा प्रतिस्थापित

[१०][ ४अ. संयुक्त ठेवी

संयुक्त ठेवीदार असल्यास, तीन पेक्षा अधिक नसलेल्या नावांनी आणि "पैकी एक किंवा उत्तरजीवित", "प्रथम क्रमांकाचा किंवा उत्तरजीवित", "कोणीही एक किंवा उत्तरजीवित" ह्यांच्यापैकी कोणत्याही का कलमासह किंवा कलमाशिवाय ठेवी स्वीकारल्या जाव्यात].

**भाग - २ ठेवींचा स्वीकार**

**५. संकीर्ण अ-बँकीय कंपन्यांद्वारे ठेवींचा स्वीकार**

१ जुलै १९७७ पासून कोणतीही संकीर्ण अबँकीय कंपनी पुढील गोष्टी करणार नाही-

अ) मागणी केल्यावर किंवा नोटिस दिल्यावर पुनर्प्रदान करण्याजोगी किंवा अशी ठेव, स्वीकारल्याच्या तारखेपासून, सहा महिन्यांपेक्षा कमी व छत्तीस महिन्यांपेक्षा अधिक कालानंतर पुनर्प्रदानाची कोणतीही ठेव स्वीकारणे, किंवा ती ठेव, नूतनीकरणाच्या तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा कमी व छत्तीस महिन्यांपेक्षा अधिक कालानंतर पुनर्प्रदान करण्याजोगी असल्याशिवाय, वरील तारखेच्या आधी किंवा नंतर, स्वीकारलेल्या कोणत्याही ठेवीचे नूतनीकरण करणे.
[११]**[** रद्द ]

[१२] **[** [ रद्द ]

ब) पुढील बाबतीत स्वीकार किंवा नूतनीकरण :

१) " एखाद्या शेअरहोल्डर कडून मिळालेली कोणतीही ठेव कोणतीही ठेव किंवा एखाद्या व्यक्तीने हमी दिलेली आणि अशा ठेवींच्या स्वीकाराच्या किंवा नूतनीकरणाच्या तारखेस, अशा ठेवींची रक्कम कंपनीच्या पुस्तकात आउटस्टँडिंग दर्शविलेली रक्कम, त्या कंपनीच्या नक्त निजनिधीच्या पंधरा टक्कयांपेक्षा जास्त असल्यास. [१३]

(२) "अ – परिवर्तनीय बॉंड्स किंवा डिबेंचर्ससह इतर कोणतीही ठेव"- [१४]

{ मात्र, एखादी संकीर्ण अबँकीय कंपनी, तिचा शेअरहोल्डर सोडून अन्य कोणत्याही व्यक्तीकडील ठेव धारण करीत असल्यास, ती परिपक्व झाल्यावर परत केली जाईल व ती नूतनीकरणास पात्र नसेल } [१५]

[१०] अधिसूचना क्र.डीएफसी (सीओसी) ६५ डीजी (टी) दि. जून १७, १९९२ अन्वये टाकण्यात आली.
[११] अधिसूचना क्र.डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर)-२००९ दि. ऑगस्ट २८, २००९ अन्वये रद्द.
[१२] अधिसूचना क्र.डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर)-२००९ दि. ऑगस्ट २८, २००९ अन्वये रद्द.
[१३] अधिसूचना क्र. डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर)-२००९ दि. ऑगस्ट २८, २००९ अन्वये प्रति-स्थापित.
[१४] अधिसूचना क्र. डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर)-२००९ दि. ऑगस्ट २८, २००९ अन्वये प्रति-स्थापित.
[१५] अधिसूचना क्र डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर)-२००९ दि. ऑगस्ट २८, २००९ अन्वये टाकण्यात आली.

[16][ [ रद्द ]

[17][ [रद्द ]

[18][स्पष्टीकरण -

नेट ओन्ड फंड्स (निव्वळ राखीव निधी) म्हणजे-

अ) अगदी अलिकडील ताळेबंदात पुढील गोष्टी वजा करुन प्रकट केलेले एकूण भरणा झालेले इक्विटी भांडवल व मुक्त राखीव निधी -

१) तोटयाची संचित शिल्लक
२) डिफर्ड रेव्हेन्यु एक्स्पेंडिचर आणि
३) इतर अमूर्त ॲसेट्स आणि

ब) ह्यातून पुढील बाबींच्या रक्कमा वजा केल्या जाव्यात -

(१) अशा कंपनीच्या पुढील कंपन्यांच्या शेअर्समधील गुंतवणुक-

१) तिच्या दुय्यम कंपन्या
२) त्याच गटातील कंपन्या
३) इतर सर्व अबँकीय कंपन्या आणि

(२) खालील बाबींचे पुस्तकी मूल्य - डिबेंचर्स, बॉड्स, थकित/ येणे कर्जे, आणि अग्रिम राशी (हायर परचेस व लीज वित्त धरुन) आणि पुढील प्रमाणे ठेवलेल्या ठेवी -

१) अशा कंपनीच्या दुय्यम कंपन्या आणि
२) त्याच गटतील कंपन्या

मात्र अशी रक्कम वरील (अ) च्या दहा टक्कया पेक्षा अधिक असावी. ]

## ६. ठेवीबाबत विनंतीच्या अर्जावर द्यावयाचा तपशील

१ जुलै १९७७ रोजी व पासून, कोणतीही संकीर्ण अबँकीय कंपनी, त्या कंपनीने पुरविलेल्या अर्जाचा फॉर्म ठेवीदाराने भरुन दिल्याशिवाय कोणत्याही ठेवीचा स्वीकार, नूतनीकरण किंवा रुपांतर करणार नाही. अशा अर्जाच्या फॉर्मवर, कंपनीज अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम ५८ अ खाली तयार केलेल्या अबँकीय वित्त कंपन्या व संकीर्ण अबँकीय कंपन्या (जाहिराती) नियम १९७७ मध्ये निर्देशिलेले सर्व तपशील असतील.

[16] अधिसूचना क्र.डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर)-२००९ दि. ऑगस्ट २८, २००९ अन्वये रद्द.
[17] अधिसूचना क्र.डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर)-२००९ दि. ऑगस्ट २८, २००९ अन्वये रद्द.
[18] अधिसूचना क्र.डीएफसी (सीओसी) १०४-ईडी (जेआरपी) दि. मार्च ३१, १९९७ अन्वये प्रति-स्थापित.

## ७. ठेवीदारांना पावत्या देणे

१) प्रत्येक संकीर्ण अबँकीय कंपनी, प्रत्येक ठेवीदाराला [१९][किंवा संयुक्त ठेवीदारांच्या गटाला] किंवा त्याच्या प्रतिनिधीला, त्या कंपनीने आधीच दिली नसल्यास, ह्या निदेशांची सुरुवात होण्यापूर्वी अथवा नंतर, ठेवीच्या स्वरुपात, त्या कंपनीला मिळालेल्या व मिळू शकणाऱ्या प्रत्येक रकमेची पावती देईल.
२) ह्या पावतीवर, त्या कंपनीच्या वतीने प्राधिकृत असलेल्या अधिकाऱ्याची सही असावी व त्या पावतीत, ठेवीची तारीख, ठेवीदाराचे नाव, त्यावर देय असलेला व्याजदर व त्या ठेवीचे पुनर्प्रदान करावयाची तारीख असावी.

## ८. ठेवींचे रजिस्टर

१) प्रत्येक संकीर्ण अबँकीय कंपनी एक किंवा अधिक रजिस्टरे ठेवून त्यात प्रत्येक ठेवीदाराचा पुढील प्रमाणे वेगळा तपशील नोंद करील -

अ) ठेवीदाराचे नाव व पत्ता
ब) प्रत्येक ठेवीची तारीख व रक्कम
क) प्रत्येक ठेवीचा काल व परिपक्वतेची तारीख
ड) प्रत्येक ठेवीवरील उपवर्जित व्याज किंवा प्रिमियमची रक्कम व तारीख
ई) मुद्दल, व्याज किंवा प्रिमियम ह्या संबंधाने प्रत्येक पुनर्प्रदानाची तारीख व रक्कम
फ) त्या ठेवीसंबंधाने इतर तपशील

२) वरील रजिस्टर किंवा रजिस्टरे त्या कंपनीच्या पंजीकृत कार्यालयात ठेवली जातील. आणि ती रजिस्टरे, त्या रजिस्टरात तपशीलवार देलेल्या ठेवींचे नूतनीकरण किंवा पुनर्प्रदान केल्याची शेवटची नोंद केलेल्या आर्थिक वर्षानंतरच्या आठ कॅलेंडर वर्षांपर्यंत जपून ठेवली जातील.

मात्र, कंपनीज अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम २०९ चे उपकलम १ मध्ये संदर्भित लेखा पुस्तके, त्या कंपनीने, त्या उपकलमाच्या तरतुदीनुसार तिच्या पंजीकृत कार्यालया ऐवजी अन्य ठिकाणी ठेवल्यास, ह्या उपपरिच्छेदाचे पुरेसे पालन केल्याचे समजले जाईल. मात्र अशा वेळी, ह्या उपकलमाच्या तरतुदीखाली रजिस्ट्रारला सादर केलेल्या नोटीसीची प्रत, त्या कंपनीने, सादरीकरण्याच्या सात दिवसांच्या आत रिझर्व बँकेकडे सादर केली पाहिजे.

## ९. संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट करावयाची माहिती

१) ह्या निदेशांची सुरुवात होण्याच्या तारखेनंतर, कंपनीज अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम २१७ च्या उपकलम (१) खाली, कंपनीच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवलेल्या, संचालक मंडळाच्या प्रत्येक अहवालामध्ये, संकीर्ण अबँकीय कंपनीच्या बाबतीत, पुढील तपशील समाविष्ट केला जाईल.

अ) ठेवीदारांबरोबर केलेल्या करारांनुसार किंवा ह्या निदेशांमधील तरतुदी ह्यापैकी लागु असेल त्यानुसार, संबंधित ठेवीदारांनी परिपक्वता दिनांकानंतर हक्क सांगितला नाही किंवा कंपनीने प्रदान केले नाही किंवा नूतनीकरण केले नाही अशा, त्या कंपनीच्या एकूण ठेवीदारांची संख्या, आणि

ब) ठेवीदारांना द्यावयाची एकूण रक्कम, तसेच वरील खंड (अ) मध्ये संदर्भित तारखांपलिकडे हक्क न सांगितलेल्या व प्रदान न केलेल्या ठेवींची एकूण रक्कम.

[१९] अधिसूचना क्र.डीएफसी (सीओसी) ६५ डीजी (टी) ९२ दि. जून १७, १९९२ अन्वये टाकण्यात आली.

२) वरील तपशील किंवा माहिती, ह्या अहवालाशी संबंधित आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तारखेस असलेल्या स्थितीसंबंधाने दिली जाईल आणि मागील उप-परिच्छेदाच्या खंड (ब) मध्ये संदर्भित असल्याप्रमाणे, हक्क न सांगितलेली व प्रदान न झालेली एकूण रक्कम रु पाच लक्षांपेक्षा अधिक असल्यास, त्यांचा समावेश, प्रदान न केलेल्या, हक्क न सांगितलेल्या रक्कमा ठेवीदारांना परत करण्यासाठी संचालक मंडळाने घेतेलेली किंवा प्रस्तावित पाउले, ह्यावरील विवरणपत्रसह असवालात केला जावा.

[२०][व्याजदर व दलालीवरील मर्यादा

९ अ [२१] [(१)ट [२२][एप्रिल २४, २००७] रोजी व पासून कोणतीही संकीर्ण अबँकीय कंपनी

अ) दरसाल दरशेकडे [२३][साडेबारा] टक्कयांपेक्षा अधिक व्याजदराने ठेवींचे आवाहान किंवा स्वीकार किंवा नूतनीकरण करणार नाही. मंथली रेस्टपेक्षा कमी असलेल्या रेस्टने व्याज दिले अथवा चक्रवाढ (कंपाउडेड) केले जाऊ शकतेः

[२४][ रद्द ]

[[२५] (ब) कोणत्याही दलालाला त्याने किंवा त्याच्या मार्फत गोळा केलेल्या खाली विहित केलेल्या दरांपेक्षा अधिक दराने दलाली दिली जाणार नाही]-

| | | |
|---|---|---|
| १) एक वर्षापेक्षा अधिक काळ नसलेल्या ठेवीसाठी | - | अशा ठेवी चा एक टक्का |
| २) एकवर्षापेक्षा अधिक व दोन वर्षापेक्षा कमी काळाच्या ठेवीसाठी | - | अशा ठेवीच्या सव्वा टक्के (दर वर्षी नाही). |
| ३) दोन वर्षापेक्षा अधिक काळाच्या ठेवीसाठी | - | अशा ठेवीच्या दीड टक्के (दर वर्षी नाही). |

[२६][ रद्द ]

ठेवीदारांना ठेवींच्या परिपक्वतेबाबत सूचना

[२७] [९ अ अ ठेवींचा परिपक्वताकाल पूर्ण होण्याच्या दोन महिने आधी, त्या ठेवींच्या ठेवीदारांना त्याबाबत सूचना देण्याची जबाबदारी संकीर्ण अबँकीय कंपन्यांचीच असेल.]

[२०] अधिसूचना क्र. डीएनबीसी.४३.ईडी(एस)-८१ दि.मार्च ३०,१९८१ द्वारा संस्थापित
[२१] अधिसूचना क्र. डीएनबीएस १७५/सीजीएम (ओपीए) -२००३ दि. सप्टेंबर १७,२००३ द्वारा परिच्छेद ९ अ ला ९ अ (१)असा क्रमांक देण्यात आला.
[२२] अधिसूचना क्र. डीएनबीएस१९६/सीजीएम(पीके) - २००७ दि. एप्रिल २४, २००७ द्वारा प्रस्थापित
[२३] अधिसूचना क्र. डीएनबीएस१९६/सीजीएम(पीके) - २००७ दि. एप्रिल २४, २००७ द्वारा प्रस्थापित
[२४] अधिसूचना क्र.डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर) —२००९ दि. ऑगस्ट १७, २००९ अन्वये तरतुद काढून टाकण्यात आली.
[२५] अधिसूचना क्र. डीएनबीसी ४६/ईडी(बी/८७ दि.फेब्रुवारी २४,१९८२ द्वारा संस्थापित
[२६] अधिसूचना क्र.डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर)-२००९ दि. ऑगस्ट २८, २००९ अन्वये रद्द.

**परिपक्वतेपूर्वीच ठेवींचे नूतनीकरण**

[28] [[29][९ अ ब]अधिकतर व्याजदराचा फायदा घेण्यासाठी, जेथे एखादी संकीर्ण अबँकीय कंपनी, "शेअर होल्डर असलेल्या" विद्यमान ठेवीदाराला [30], त्याच्या ठेवीचे नूतनीकरण करण्यास परवानगी देईल तेथे ती कंपनी त्या ठेवीदाराला ठरविलेला वाढीव व्याजदर देऊ करील.
मात्र त्यासाठी पुढील अटी आहेत.

१) ती ठेव, ह्या निदेशांच्या तरतुदींना धरुन, आणि मूळ कराराच्या उर्वरित कालावधीपेक्षा अधिक कालासाठी नूतनीकृत करण्यात आली आहे. आणि-

२) त्या ठेवीच्या संपलेल्या (एक्सपायर्ड) कालावधीवरील व्याज हे, अशी ठेव,[31][ज्या कालावधीसाठी त्या कंपनीने सर्वसाधारणतः दिली] किंवा घेतली/तडजोड केली असती तर त्या व्याजदरामधून एक टक्का पॉईंट कमी दिले जाईल.]

मुदतबाह्य ठेवींचे नूतनीकरण

[32][[25](९एसी) - एखादी संकीर्ण अबँकीय कंपनी, तिला तसे वाटल्यास, मुदतबाह्य (ओव्हरड्यु) ठेवीवर किंवा त्या मुदतबाह्य ठेवीच्या भागावर त्या ठेवीच्या परिपक्वतेच्या तारखेपासून व्याज देऊ शकते. मात्र त्यासाठी

अ) ह्या निदेशांमधील अन्य तरतुदींनुसार, ओव्हरड्यु ठेवींची एकूण रक्कम किंवा त्याचा भाग, त्याच्या परिपक्वतेच्या तारखेपासून भाविष्यातील एखाद्या तारखेपर्यंत नूतनीकृत करण्यात आली असली पहिजे.

ब) ह्याबाबत असलेले व्याज, अशा मुदतबाह्य ठेवीच्या परिपक्वतेच्या तारखेस प्रचलित असलेल्या व्याजदराने दिले जाईल आणि ते व्याज केवळ अशा प्रकारे नूतनीकरण केलेल्या ठेवीच्या रकमेवरच दिले जाईल.]

**ठेवींचे पुनर्प्रदान करण्याबाबत सर्वसाधारण तरतुदी**

**[33][किमान लॉक-इन कालावधी आणि ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास करावयाचे पुनर्-प्रदान**

९ब (१) कोणतीही संकीर्ण अबँकीय कंपनी, ठेव स्वीकारल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या कालावधीत (लॉक इन कालावधी) त्या ठेवीविरुध्द कर्ज देणार नाही किंवा त्या ठेवीचे मुदतपूर्व पुनर्प्रदान करणार नाही]

मात्र, ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास, एखादी संकीर्ण अबँकीय कंपनी, तिचे समाधान होईल असा मृत्युचा पुरावा सादर केल्यासच, उत्तरजीवित व्यक्ती कलम असलेल्या संयुक्त खात्याच्या बाबतीत, उत्तरजीवित ठेवीदारांना, किंवा त्या मृत ठेवीदाराच्या नामनिर्देशिताला किंवा कायदेशीर वारसांना, लॉकइन कालावधीतही त्या कंपनीचे समाधान होईल असा, मृत्यु बाबतचा पुरावा सादर केल्यावरच त्या ठेवीचे पुनर्प्रदान करु शकते.

[28] आधिसूचना क्र.डीएफसी (सीओसी) ६२/डिजी(जे) दि. सप्टेंबर १९,१९९१ द्वारा संस्थापित.
[29] आधिसूचना क्र.१८१ दि.ऑक्टोंबर ५,२००४ द्वारा पुनर्-क्रमांकित.
[30] अधिसूचना क्र.डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर)-२००९ दि. ऑगस्ट २८, २००९ द्वारा संस्थापित.
[31] आधिसूचना क्र.९४ ईडी(जेआरपी)/९६ दि. जानेवारी १, १९९७ द्वारा प्रतिस्थापित.
[32] आधिसूचना क्र.७९ डीजी(टी)/९४ दि.३१.१२.१९९४ द्वारा संस्थापित.
[33] आधिसूचना क्र.१८१ दि. ऑक्टोंबर ५, २००४ द्वारा संस्थापित

**समस्यापूर्ण नसलेल्या एखाद्या संकीर्ण अबँकीय कंपनीद्वारा सार्वजनिक ठेवींचे पुनर्प्रदान** एक प्रॉब्लेम संकीर्ण अबँकीय कंपनी नसलेल्या संकीर्ण अबँकीय कंपनीद्वारा ठेवींचे पुनर् प्रदान ( [३४] काढून टाकण्यात आली )

२) उप-परिच्छेद (१) मधील तरतुदीनुसार, एखादी संकीर्ण अबँकीय कंपनी ही समस्यापूर्ण संकीर्ण अबँकीय कंपनी नसल्यास -

अ) ऑक्टोंबर ५, २००४ पासून, तिच्या मते योग्य वाटल्यास, एखाद्या ठेवीचे मुदतपूर्व पुनर्प्रदान करु शकते.

मात्र, वरील तारखेच्या आधीच स्वीकारलेल्या ठेवीच्या बाबतीत, अशी संकीर्ण अबँकीय कंपनी, अशा ठेवीच्या अटी व शर्ती परवानगी देत असल्यास, त्या ठेवीच्या तारखेपासून तीन महिने झाल्यानंतर ठेवीदाराने विनंती केल्यास, त्या ठेवीचे मुदतपूर्व पुनर्प्रदान करु शकते.

ब) ठेवीच्या तारखेपासून तीन महिने झाल्यानंतर त्या ठेवीदाराला त्या ठेवीवर दिल्या जाणाऱ्या व्याजदरापेक्षा दोन टक्के अधिक दराने, त्या ठेवीच्या रकमेच्या पंचाहत्तर टक्के कर्ज देऊ शकते.

एखाद्या प्रॉब्लेम संकीर्ण अबँकीय कंपनीद्वारा ठेवीचे पुनर् प्रदान (डिलिटेड [३५] )

३) उप-परिच्छेद (१) मधील तरतुदींचे अनुपालन केले गेले असल्यास, ठेवीदाराला तातडीने आलेला खर्च भागविण्यास, एखादी समस्यापूर्ण संकीर्ण अबँकीय कंपनी, पुढील बाबतीत, मुदत पूर्व पूर्वप्रदान करु शकते किंवा त्या ठेवीविरुध्द कर्ज देऊ शकते :-

अ) एखाद्या छोट्या ठेवीचे संपूर्ण पुनर्प्रदान करुन किंवा रु.१००००/- पेक्षा जास्त नसलेली रक्कम अन्य एखाद्या ठेवीबाबत देऊन; किंवा-

ब) एखाद्या छोट्या ठेवीविरुध्द कर्ज देऊन किंवा दुसऱ्या एखाद्या ठेवीविरुध्द रु १००००/- पेक्षा अधिक असलेली रक्कम कर्ज म्हणून, त्या ठेवीवर द्यावयाच्या व्याजदरापेक्षा दोन टक्के अधिक दराने देऊन.

[३६] [**समस्यापूर्ण संकीर्ण अबँकीय कंपनीद्वारा ठेवींचे एकत्रीकरण**

४) समस्यापूर्ण संकीर्ण अबँकीय कंपनीद्वारा, एकमेव/त्याच क्षमतेत असलेल्या प्रथम नाव असलेल्या ठेवीदाराच्या नावे असलेल्या सर्व ठेवी खात्यांना, मुदतपूर्वी पुनर्प्रदान किंवा कर्ज देण्यासाठी, एकत्रित करुन, एकच ठेवीखाते समजले जाईल.
मात्र, उपपरिच्छेद (१) मध्ये दिल्याप्रमाणे, ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास,त्याबाबत हा खंड/कलम लागु होणार नाही.]

**<u>ठेवींच्या मुदतपूर्व पुनर्प्रदानावरील व्याजदर</u>**

५) एखादी संकीर्ण अबँकीय कंपनी, केवळ तिच्या मतानुसार किंवा ठेवीदाराच्या विनंतीनुसार, ती ठेव स्वीकारल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांनंतर परंतु ती परिपक्व होण्यापूर्वी (ठेवीदाराचा मृत्यु झाल्याने मुदतपूर्व पुनर्प्रदान धरुन) एखाद्या ठेवीचे पुनर्प्रदान करत असल्यास, त्याबाबत पुढील व्याजदर लागु होतील-

[३४] अधिसूचना क्र.डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर)-२००९ दि. ऑगस्ट २८, २००९ अन्वये रद्द.
[३५] अधिसूचना क्र.डीएनबीएस.२०७/सीजीएम (एएनआर)-२००९ दि. ऑगस्ट २८, २००९ अन्वये रद्द.
[३६] अधिसूचना क्र. डिएनबीएस १८४/सीजीएम (पीके) -२००५ दि.डिसेंबर ९,२००५ द्वारा प्रस्थापित

| | |
|---|---|
| तीन महिन्यांनंतर परंतु सहा महिन्यांपूर्वी | काहीही व्याज नाही |
| सहा महिन्यांनंतर परंतु परिपक्वतेच्या तारखेपूर्वी | ती ठेव सुरु राहिली असल्याच्या काळासाठी, त्या ठेवीला लागु असलेल्या व्याजदरापेक्षा दोन टक्के कमी किंवा त्या काळासाठी कोणताही व्याजदर विहित केला नसल्यास, संकीर्ण अबँकीय कंपनी, ज्या किमान दराने ठेवी स्वीकारतात त्या दरापेक्षा ३ टक्के कमी |

**स्प्टीकरण** - ह्या परिच्छेदासाठी

अ) “समस्यापूर्ण संकीर्ण अबँकीय कंपनी” म्हणजे, पुढील प्रमाणे असलेली संकीर्ण अबँकीय कंपनी -

१) परिपक्व झालेल्या ठेवींबाबतच्या पुनर्प्रदानाची कोणतीही कायदेशीर मागणी, पाच कामाच्या दिवसांच्या आत पूर्ण करण्यास अपयशी ठरलेली किंवा तसे करण्यास नकार देणारी. किंवा-

२) एखाद्या ठेवीचे किंवा तिच्या भागाचे पुनर्प्रदान करण्यामध्ये, तिच्या कसूरीबाबत, एखाद्या छोट्या ठेवीदाराला, कंपनीज् अधिनियम, १९५६ च्या कलम ५८ अअ खाली सीएलबीला कळविणारी. किंवा-

३) तिची ठेवींबाबतची दायित्वे पूर्ण करण्यासाठी, तिच्या तरल (लिक्विड) ॲसेट्स प्रतिभूतींची निकासी करण्यासाठी ह्या बँकेकडे येणारी. किंवा -

४) ठेवी किंवा अन्य दायित्वांना पूर्ण करण्यासाठी, संकीर्ण अबँकीय (रिझर्व बँक) निदेश, १९७७ च्या तरतुदीबाबत कोणतीही सवलत किंवा शिथिलता किंवा सूट मागण्यासाठी ह्या बँकेकडे येणारी. किंवा
५) ठेवींचे पुनर्प्रदान करण्याबाबत ठेवीदारांच्या तक्रारींच्या आधारे किंवा थकबाकी न दिली जाण्याबाबत त्या कंपनीच्या धनकोंनी केलेल्या तक्रारींच्या आधारे किंवा सुरुवातीपासूनच, समस्यापूर्ण संकीर्ण अबँकीय कंपनी म्हणून, ह्या बँकेद्वारे ओळखली जाणारी कंपनी.

ब) “छोट्या ठेवी” म्हणजे, एखाद्या संकीर्ण अबँकीय कंपनीच्या सर्व शाखांमध्ये, केवळ एकाच किंवा त्याच क्षमतेत असलेल्या प्रथम नावाच्या ठेवीदाराच्या नावे एकूण ठेव रु १०,००० पेक्षा अधिक नसलेली रक्कम.]

## भाग ३-संकीर्ण

**रिझर्व बँकेला द्यावयाच्या ताळेबंद व लेखा आणि संचालकांचा अहवाल ह्यांच्या प्रती.**

१०) कंपनीज् अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम २१७ (१) मधील अटींनुसार, प्रत्येक संकीर्ण अबँकीय कंपनीने, तिने आधीच तसे केले नसल्यास, प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तारखेस असलेला व लेखा परीक्षण झालेला ताळेबंद, आणि त्या कंपनीने सर्वसाधारण सभेत पारित केलेला, त्या वर्षासाठी असलेला नफा-तोटा लेखा आणि अशा सभेत कंपनीसमोर ठेवलेल्या संचालक मंडळाच्या अहवालाची प्रत रिझर्व बँकेला, अशा सभेच्या पंधरा दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

**रिझर्व बँकेला सादर करावयाचे अहवाल (रिटर्न्स)**

११ १) परिच्छेद १० च्या तरतुदींना धक्का न लावता, प्रत्येक संकीर्ण अबँकीय कंपनी [३७](ठेवी स्वीकारणारी किंवा ठेवणारी), ह्याच्या प्रथम शेड्युलमध्ये विहित केलेल्या तारखांना असलेल्या त्या कंपनीच्या स्थितीबाबतची विहित केलेली माहिती देणारा अहवाल (रिटर्न) रिझर्व बँकेला सादर करील.

२) १) हे निदेश जारी होण्यापासून किंवा तिने व्यवहारांची सुरुवात केल्यापासून एक महिन्याच्या आत (ह्यापैकी जे नंतर असेल तेव्हा) पुढील बाबींची यादी असलेले विवरण रिझर्व बँकेला सादर करील-

अ) मुख्य अधिकाऱ्यांची नावे व अधिकृत हुद्दे.
ब) त्या कंपनीच्या संचालकांची नावे व निवासी पत्ता
क) वरील उप-परिच्छेद (१) मध्ये विहित केलेल्या अहवालांवर सही करण्यास प्राधिकृत असलेल्या अधिकाऱ्यांच्या नमुना-सह्या.

२) ह्या उपपरिच्छेदाच्या कलम (१) मध्ये संदर्भित यादीमध्ये बदल झाल्यास, तो बदल झाल्यानंतर एक महिन्याच्या आत त्यासंबंधी रिझर्व बँकेला कळविण्यात यावा.

**[३८][पर्यवेक्षण विभागाला] सादर करावयाचे ताळेबंद, अहवाल इत्यादि**

१२) ह्या निदेशांच्या दुसऱ्या शेड्युलमध्ये विहित केल्याप्रमाणे, ह्या निदेशांनुसार रिझर्व बँकेला सादर करावयाचे ताळेबंद, अहवाल किंव माहिती, त्या कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय, रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात येते, त्या रिझर्व बँकेच्या [३९][पर्यवेक्षण विभाग] प्रादेशिक कार्यालयकडे पाठविली जाईल.

**[४०][जाहिराती आणि जाहिरातीच्या ऐवजी निवेदन]**

१३ (१) प्रत्येक संकीर्ण अबँकीय कंपनी, अबँकीय वित्त कंपन्या व संकीर्ण अबँकीय (जाहिरात) नियम, १९७७ च्या तरतुदींचे पालन करील आणि त्याखाली दिल्या जाणाऱ्या प्रत्येक जाहिरातीत पुढील बाबी विहित करील-

अ) ठेवीदाराला मिळणारा व्याज, प्रिमियम, बोनस किंवा अन्य लाभ ह्यांच्या रिटर्नच्या प्रत्यक्ष दर.
ब) ठेवीदाराला प्रदान करण्याची रीत
क) ठेवीचा परिपक्वता काल
ड) विहित ठेवीवर देय व्याज

[३७] अधिसूचना क्र.डीएनबीएस.१८५/सीजीएम(पीके)- २००५ दि.डिसेंबर २७.२००५ द्वारा संस्थापित
[३८] अधिसूचना क्र.डीएफसी(सीओसी)८७ईडी(जेआरपी)९६ दि. जुलै २४, १९९६ द्वारा प्रतिस्थापित
[३९] अधिसूचना क्र.डीएफसी(सीओसी)८७ईडी(जेआरपी)९६ दि. जुलै २४, १९९६ द्वारा प्रतिस्थापित
[४०] अधिसूचना क्र.डीएफसी(सीओसी) ६२डीजी(जे)-९१ सप्टेंबर १९ १९९१ द्वारा प्रतिस्थापित

ई) ठेवीदाराने त्या ठेवीची मुदतपूर्व निकासी केल्यास देय असलेला व्याजदर, त्या ठेवीचे नूतनीकरण केल्यास लागु होणाऱ्या अटी व शर्ती. आणि

फ) त्या ठेवी स्वीकारल्या/नूतनीकरण केल्या जाण्यासाठी असलेल्या अटी व शर्तींबाबत इतर विशेष लक्षणे.

[४१][ग) त्यांनी आवाहित केलेल्या ठेवींना विमा संरक्षण नाही.]

२) ठेवींचे आवाहन करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला परवानगी देणे. आमंत्रित करणे किंवा भाग पाडणे ह्या शिवायच, एखादी कंपनी ठेवी स्वीकारण्यास इच्छुक असल्यास, अशा ठेवी स्वीकारण्यापूर्वी, त्या कंपनीचे पंजीकृत कार्यालया, रिझर्व बँकेच्या, [४२][पर्यवेक्षण विभागाच्या] ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्राखाली येते, त्या कार्यालयाकडे, अबँकीय वित्त कंपन्या (जाहिरात) नियम, १६७७ अनुसार, जाहिरातीच्या ऐवजी/बदली, जाहिरातीमध्ये द्यावयाच्या तपशीलवार माहितीचे विवरणपत्र, व त्याच बरोबर, वरील उपपरिच्छेद (१) मध्ये दिलेला तपशील, ह्या नियमांमध्ये विहित केलेल्या प्रकारे, सही करुन सादर करावा.

३) उपपरिच्छेद (२) खाली सादर केलेले विवरणपत्र, ते ज्या आर्थिक वर्षासाठी दिले गेले असेल, त्या आर्थिक वर्षाच्या समाप्तीच्या तारखेपासून सहा महिने संपेपर्यंत, किंवा कंपनीचा ताळेबंद सर्वसाधारण सभेमध्ये कंपनीसमोर ठेवला जाण्याच्या तारखेपर्यंत किंवा एखाद्या वर्षासाठी वार्षिक सर्वसाधारण घेतली गेली नसल्यास, कंपनीज अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या तरतुदींनुसार, ती सभा घेण्यासाठी उशीरात उशीर असलेल्या तारखेपर्यंत (ह्यापैकी आधी असेल ते) वैध असेल, आणि त्या आर्थिक वर्षात ठेवी स्वीकारण्यापूर्वी, त्यानंतरच्या प्रत्येक आर्थिक वर्षात एक नवीन विवरणपत्र सादर केले जाईल.

## १४. सूट (एक्झेंप्शन)

कोणत्याही इतर न्याय्य व पुरेशा कारणासाठी किंवा त्रास टाळण्यासाठी, रिझर्व बँक, अनुपालन करण्यासाठी वेळ वाढवून देऊ शकते किंवा रिझर्व बँकेने घातलेल्या अटींनुसार, कोणत्याही कंपनीला किंवा कंपन्यांच्या वर्गाला, ह्या निदेशांच्या सर्व किंवा कोणत्याही किंवा तरतुदींपासून, सर्वसाधारणतः कोणत्याही विशिष्ट कालावधीची सूट देऊ शकते.

## १५. काही इतर अटींचे लागु न होणे

अबँकीय वित्तीय कंपन्या (रिझर्व बँक) निदेश,१९७७ मधील कोणतीही बाब, ह्या निदेशांच्या परिच्छेद २ मध्ये संदर्भित प्रकारच्या वित्तीय संस्थेला लागु होणार नाही.

## १६. संकीर्ण अबँकीय कंपन्या (रिझर्व बँक) निदेश १९७३ चे उल्लंघन केल्यामुळे केलेली किंवा करावयाची कारवाई वाचविणे.

येथे स्पष्ट करण्यात येते की, वेळोवेळी सुधारित केलेल्या, संकीर्ण अबँकीय कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, १९७३ ह्यांच्या बदली दुसरे आल्यासही त्याना पुढील गोष्टींवर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही -

१) त्याखाली आलेला/ मिळालेला कोणताही हक्क, दायित्व किंवा जबाबदारी.

२) त्याखाली केलेल्या/निर्माण झालेल्या नियमभंग/ उल्लंघनामुळे मिळालेला दंड, जप्ती किंवा शिक्षा.

[४१] अधिसूचना क्र. डीएनबीएस.१६२/सीजीएम (सीएसएम)-२००२ दि ऑक्टोंबर १, २००२ द्वारा संस्थापित.
[४२] अधिसूचना क्र. डीएफसी (सीओसी) ९४ ईडी (जेआरपी)/९६ दि. जानेवारी १, १९९७ द्वारा प्रतिस्थापित.

३) वर निर्देशिलेल्या कोणताही हक्क, विशेषाधिकार, दायित्व, जबाबदारी, दंड, जप्ती,
किंवा शिक्षा ह्यासंबंधीचे कोणतेही तपासकार्य, कायदेशीर कारवाई किंवा उपाय, आणि जणु काही ह्या निदेशात बदल झालाच नाही असे समजले जाऊन, असे तपासकार्य, कायदेशीर कारवाई, किंवा उपाय लागु केले जाईल, सुरुच राहील किंवा जारी केले जातील.

(सही)
(आर के हजारी)
डेप्युटी गव्हर्नर

## सुधारणा करणाऱ्या आधिसूचनांची यादी

| | आधिसूचना क्रमांक | दिनांक |
|---|---|---|
| १ | ७४ | एप्रिल १९, १९९४ |
| २ | ७९ | डिसेंबर ३१, १९९४ |
| ३ | ८१ | ऑक्टोबर २८, १९९५ |
| ४ | ८७ | जुलै २४, १९९६ |
| ५ | ९४ | जानेवारी १, १९९७ |
| ६ | १०१ | मार्च २९, १९९७ |
| ७ | १०४ | मार्च ३१, १९९७ |
| ८ | १४५ | जुन ३०, २००० |
| ९ | १४७ | मार्च ३१, २००१ |
| १० | १५० | जुन २७, २००१ |
| ११ | १५२ | ऑक्टोबर ३१, २००१ |
| १२ | १८१ | ऑक्टोबर ५, २००४ |
| १३ | १८४ | डिसेंबर ९, २००५ |
| १४ | १८५ | डिसेंबर२७, २००५ |
| १५ | १९१ | जानेवारी ४, ७ |
| १६ | १९६ | एप्रिल २४, २००७ |
| १७ | २०७ | ऑगस्ट २८, २००९ |

**जोडपत्र**

**दुसरे शेड्युल**
**(कृपया ह्या निदेशांचा परिछेद १२ पहा)**
**भारतीय रिझर्व बँकेच्या प्रत्येक प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकारकक्षे खालील क्षेत्र**

| कार्यालयाची नावे व पत्ता | अधिकार कक्षे खालील क्षेत्र |
|---|---|
| १.अहमदाबाद क्षेत्रिय कार्यालय गज्जार चेंबर्स, आश्रम रोड, अहमदाबाद -३८० ००९. | गुजरात राज्य आणि संयुक्त क्षेत्र – दमण दिव आणि दादरा नगर ह वेली |
| २. बेंगलुरु क्षेत्रिय कार्यालय १०-३-८, नूपथुंगा रोड, बेंगलुरु-५६० ००२. | कर्नाटक राज्य |
| ३. भोपाळ क्षेत्रिय कार्यालय होशंगाबाद रोड, पी.ओ.बॉ क्र. ३२, भोपाळ -४६२ ०११. | [४३][छतीसगढ आणि मध्य प्रदेश मधील राज्य] |
| ४. भुवनेश्वर क्षेत्रिय कार्यालय पंडित जवाह रलाल नेह रु मार्ग, पो. भुबनेश्वर -७५१ ००१. | ओरिसा राज्य. |
| ५.[४४][कोलकाता] क्षेत्रिय कार्यालय, १५, नेताजी सुभाष रोड, [४५][कोलकाता]-७०० ००१. | सिक्कीम राज्य आणि वेस्ट बंगाल आणि अंदमान आणि निकोबार आयलंड संयुक्त प्रांत |
| ६.चंदीगढ क्षेत्रिय कार्यालय, ११, सेंट्रल विस्टा, नविन ऑफिस बिल्डींग, टेलिफोन भवन समोर सेकटर १७, चंदीगढ-१६० ०१७. | हि माचल प्रदेश, पंजाब यांची राज्य आणि चंदीगढयांचा संयुक्त प्रांत |
| ७. चेन्नई क्षेत्रिय कार्यालय, फोर्ट ग्लॉसिस, राजाजी सलाइ, चेन्नई -६०० ००१. | तमिळनाडू राज्य आणि पाँडिचेरी चा संयुक्त प्रांत. |

[४३] आधिसूचना, क्र.१५० दि. जून २७, २००१ द्वारा प्रतिस्थापित
[४४] आधिसूचना, क्र.१५० दि. जून २७, २००१ द्वारा प्रतिस्थापित
